## अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ११ जून**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ जिल्हा कार्यालयाच्यावतीने या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या १० वी, १२ वी, पदवी, वैद्यकीय व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्याने किंवा त्यापेक्षा गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांना महामंडळाकडुन जेष्ठता व गुण क्रमांकानुसार अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजुर करण्यात येणार आहे.

मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील मादगी व मादिगा पोटजातीतील विद्यार्थी, विद्यार्थीनींनी जिल्हा कार्यालय संपर्क साधुन शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावे, असे महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी कळविले आहे. तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनींनी आपले अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सेवाग्राम रोड वर्धा येथे दि. २० जुन पर्यत सादर करावे. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, असे कळविण्यात आले आहे.

## तीन महिण्यांपुर्वी गायब झालेल्या बालकाचा बळी की, वन्यप्राण्याने घेतला जिव

**▢पोलीसांचा तपास सुरू ▢पाच संयुक्त पथक छानुन काढत आहे वनक्षेत्र**





**महासागर प्रतिनिधी**
**आर्वी, दि. ११जून**

मांडला लगतच्या वन क्षेत्रात वास्तव्य करुन राहत असलेल्या मध्यप्रदेश येथील आदिवासी कुंटूंबातील तिन वर्षाचा एक बालक होळीच्या एक दिवस आधी गायब झाला. पोलीसांनी त्याचा कसुन शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र यश आले नाही. पोलीस अधिक्षक अनुराग जैन यांच्या आदेशाने पुन्हा बुधवारी (ता.११) अप्पर पोलीस अधिक्षक सागर कवडे यांच्या नेतृत्वात पोलीस व वनविभागाच्या संयुक्त पथकाच्या सहाय्याने शोध सुरू करण्यात आला आहे. हरविलेल्या या बालकाचा अंधश्रध्देपोटी बळी गेला की वन्य प्राण्याने त्याचा जिव घेतला हे कळायला काहीच मार्ग यातुन काही मिळत काय? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कार्तीक चेंगड असे हरविलेल्या मुलाचे नाव आहे. मध्यप्रदेश येथुन पाच आदिवासी परिवार मांडला येथे शेती करण्याकरीता आले होते. त्यांनी मांडला लगतच्या वनक्षेत्रात झोपड्या बांधुन आपले वास्तव्य सुरू केले. होळीच्या एक दिवस आधी आई वडील शेतात गेल्यावर दुपारचे वेळी कार्तीक शौचास लगतच्या शेता जवळ गेला मात्र परत आलाच नाही. आई वडीलाने त्याची तक्रार पोलीसात केली तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी देवराव खंडेराव व ठाणेदार सतिश डेहणकर यांच्या मार्गादर्शनात पोलीस व वनविभागाच्या पथकाने सामाजीक संघटनेच्या कार्यकर्त्यांना सोबत घेवुन शोध सुरू केला. संपुर्ण वन परिसर पिंजून काढला मात्र थांगपत्ता लागला नाही. अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सुध्दा प्रयत्न केले मात्र काहीच उपयोग झाला नसल्याने प्रकरण थंड्या बस्त्यात पडले होते.

**रक्त नमुण्याचा अहवाल येताच तपासाला गती**

तत्पुर्वी शोध पथकाला नाल्यातील झाडीयुक्त भागात एका दगडावर रक्ताचे डाग आढळुन आले होते. ते परिक्षणाकरिता पाठवीण्यात आले. त्याचा अहवाल नुकताच प्राप्त झाला असुन ते रक्त मानवाचेच असल्याचे निष्पन्न झाले आणी कार्तीकचा एक तर अंधश्रध्दे पोटी बळी दिल्या गेला असावा अथवा वन्य प्राण्याने त्याचा जीव घेतला असावा असा संशय निर्माण झाला आणी वर्धा पोलीस अधिक्षक अनुराग जैन यांनी या दृष्टिने तपास करण्याचे आदेश दिले.

### पाच पथक २५० पोलीस व समाजसेवक घेत आहे शोध

वर्धा पोलीस अधिक्षक अनुराग जैन यांच्या आदेशानुसार अप्र पोलीस अधिक्षक सागर कवडे, सहाय्यक पोलीस अधिक्षक राहुल चव्हाण, ठाणेदार सतीश डेहणकर यांच्या मार्गदर्शनात पाच पथकातील २५० पोलीस व वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी सकाळी सात वाजता पासुन वन परिसरात शोध घेत आहे. त्यांना माजी नगर परिषद उपाध्यक्ष दशरथ जाधव, प्रा. रवींद्र दारुंडे, नितीन आष्टीकर, दर्पण टोकस, मोहम्मद जमील आदि सुध्दा सहकार्य करीत आहे. वृत्त लीहीपर्यंत शोध मोहिमेच्या हाती काहीच लागले नाही.

## साहेब ! अंगावर कपडे होते आता ते पण घ्या !

**बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनात शेतकऱ्यांचे आर्वीत अभिनव आंदोलन**



**महासागर प्रतिनिधी**
**आर्वी, दि. ११ जून**

माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफा सह संबंधित १७ मागण्यांसाठी मोझरी येथे सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला समर्थन देण्यासाठी आर्वी येथे शेतकऱ्यांनी बाळा जगताप यांच्या नेतृत्वात अभिनव आंदोलन करून समर्थन केले. शासन प्रशासनाच्या निर्लज्य कारभारामुळे आता फक्त आम्हा शेतकऱ्यांच्या अंगावर कपडे शिल्लक राहिले आहे. आता ते पण तुम्ही घेऊन घ्या अशा शब्दात बाळा जगताप यांनी आपल्या भावना तहसील कार्यालय आर्वी येथे तहसीलदार यांच्या समक्ष मांडत . बाळा जगताप यांच्यासह उपस्थित शेतकऱ्यांनी आपले कपडे सुद्धा प्रशासनाच्या स्वाधीन करीत मोझरी येथे सुरू असलेल्या या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला समर्थन जाहीर केले.

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी. दिव्यांग व विधवा महिलांना ६हजार रुपये मानधन, हमीभावावर २०टक्के अनुदान., ०७ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्ताप्रमाणे शासन निर्णय काढण्यात यावे, तरुणांच्या हाताला काम व योग्य दाम देण्यात यावे, रोजगार भरती , शेतकऱ्याप्रमाणे शेतमजुरांना सुद्धा आर्थिक सहाय्य देण्यात यावे. शेतमजुरांकरीता स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात यावे. शहराप्रमाणे ग्रामीण भागात सुद्धा घरकुलाला ५ लाख अनुदान देण्यात यावे. मेंढपाळ, मच्छीमार , ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या अशा एकूण १७ मागण्यांचे समर्थन करण्याकरिता आज तहसील कार्यालय येथे बाळा जगताप यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी आंदोलन केले. यावेळी जगताप यांच्यासह सुधीर जाचक, विक्रम भगत, संजय कुरिल,कुणाल चव्हाण, राजेश आगरकर, गुड्डू पठाण, अबरार खान, शेख जफर, अब्दुल राहिल, शेख कलीम, अंकुश गोटेफोडे, प्रवीण वाघ, प्रफुल कुंबोत, मंगेश कोल्हे, धीरज गिरडकर, राजू देऊळकर, किरण लोखंडे, शेख इकबाल यांच्यासह अनेक शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लहान भावाने मोठ्या भावाला धारदार शस्त्राने भोसकून केले ठार

**▢शेती धुऱ्याचा वाद ▢आरोपीला पोलिस कोठडी**

**महासागर प्रतिनिधी**
**देवळी, दि. ११ जून.**

शेताचा वाद विकोपाला गेला आणि लहान भावाने मोठ्या भावाला धारदार शस्त्राने (लांब सतुराने) शेतामध्ये मृतकावर सपासप वार करून जागीच ठार केले. ही घटना देवळीपासुन ३ किलोमीटर अंतरावरील दिघी शिवारातील शेतात मंगळवारी सायंकाळी पावणेसहा वाजता दरम्यान घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून आरोपीला गजाआड केले. आरोपी बाबा येडणे अटक करण्यात आली



असून पोलिसांतर्फे न्यायालयात हजर केल्यावर आरोपीला पोलीस कोठडी मिळाली आहे.

शंकर नानाजी येडणे वय(६५)असे मृताचे नाव आहे तर बाबाराव नानाजी येडणे वय(५८) हे दोघे सख्खे भाऊ शिल्लक शेतीच्या धुऱ्याच्या वादावरून इतके वाद विकोपाला जाऊन लहान भाऊ मोठ्याचा खून करेल अशी कल्पना कोणी करू शकत नाही.आरोपी बाबा येडणे व मृतक शंकर येडणे या दोघांचे शेत आजूबाजूला असून घटना घडण्यापूर्वी या दोघांमध्ये शेताच्या धुऱ्यावरून वाद झाला काही दिवसाआधी आरोपी आणि मृतक या दोघांचा लहान भाऊ साहेबराव येडणे याच्या शेताचे साहित्य चोरी गेले होते. या साहित्यात डवरे ,तिफन ,नागर, व ओलीताचे दहा पाईप चोरी गेलेल्या सामानामध्ये समावेश आहे. या चोरीची शहानिशा करीत असताना साहेबराव येडणे याला बाबा येडणे याच्यावर संशय होता. साहेबराव याने मोठा भाऊ शंकर यांच्यासोबत जाऊन देवळी पोलिसात तक्रार दिली होती ही तक्रार मृतक शंकर येडणे यांच्या सांगण्यावरून करण्यात आल्याचा बाबा येडणे याचा संशय होता..त्यामुळे बाबाचा मोठा भाऊ शंकरवर राग होता याचा वचपा काढण्यासाठी हे हत्याकांड घडल्याचे सांगण्यात येत आहे. कारण मात्र धुऱ्याचे कारण हत्याकांडाला कारणीभूत ठरले. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल चव्हाण आणि पोलीस निरीक्षण अमोल मंडल कर घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आणि पुढील तपास पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## शेतातील तिळाचा ढीग पेटविला

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि.११ जून**

शेतात कापणी करून लावून ठेवलेला तीळाचा ढीग अज्ञात व्यक्तीने पेटविला, घटनेमुळे शेतकयांचे मोठे नुकसान आर्थिक नुकसान झाले, ही घटना सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गणेशपूर शेत शिवारातउघडकीस आली, या प्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली, उद्धव चंपतराव कोल्हा (६५) रा. क्षीरसमुद्रपूर यांच्या तक्रारीवरुन अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला, शेतक-याला नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## मुरुमाची चोरटी वाहतूक

**२० लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**महासागर प्रतिनिधी**
**पुलगाव दि.११ जून**

मुरुमाची चोरटी वाहतुक करणा-यांवर पोलिसांनी कारवाई करीत २० लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी सहायक पोलिस अधीक्षक राहुल चव्हाण यांना गस्ती दरम्यान रसुलाबाद चौफुलीच्या विरूळ गावाकडे मुरुमाची चोरटी वाहतुक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली माहितीच्या आधारावर रसुलाबाद चौफुली परिसरात छापा टाकला असता ट्रकने अवैधरित्या मुरूम चोरून वाहतुककरीत असतांनाचोरटे मिळुन आल्याने ट्रक चालक व मालकाविरूध्द कायदेशीर कार्यवाही



करून द २०लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी प्रकाश तुकाराम कावरे, वय्( ५२) रा. नेताजी वार्ड आर्वी, पी. नागण्णा पॅन्टा, वय-(४५) रा. कुरनुल तेलंगणा ह.मु.आर्वी, या दोघांच्या ताब्यातुन मुरुम भरलेले ट्रक जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुरागजैन, अपर पोलिस अधीक्षक डॉ.सागर कवडे, यांयांचे मार्गदर्शनात सहायक पोलिस अधीक्षक राहुल चव्हाण यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

## जिल्ह्यातील महसूल विभागाच्या प्रश्नांवर मुंबईत बैठक आज

**▢महसूल मंत्र्यांच्या दालनात बैठक ▢पालकमंत्री भोयर यांचा पुढाकार**

**महासागर प्रतिनिधी वर्धा,दि.११ जून.**

महसूल विभागाअंतर्गत प्रलंबित असलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारातून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक १२ जून रोजी मुंबई येथे सायंकाळी ४.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अनेक वर्षापासून महसूल विभागांतर्गत अनेक प्रश्न प्रलंबित असल्याने नागरिकांच्या सतत तक्रारी पालकमंत्री डॉ. भोयर यांना प्राप्त होत आहे. सदर प्रकरणे राज्य शासनाशी संबंधित असल्याने पालकमंत्री भोयर यांनी त्या अनुषंगाने बैठकीसाठी पुढाकार घेतला होता. बैठकीला महसूल व वन विभागाचे अधिकारी तसेच नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी उपस्थित राहणार आहे. तसेच स्थानिक स्तरावरील महसूल विभागाचे अधिकारी देखील व्हीसी द्वारे बैठकीत सहभागी होतील. बैठकीत जिल्ह्यातील फ्लॅट धारकांना फ्लॅटनिहाय वरटिकल सातबारा, वर्धा शहरातील रामनगर येथील निवासी भूखंडधारकांचे भूखंड नियमाकुल करून त्यांना पट्टयांचे वाटप, वर्धेतील साने गुरूजी नगर येथील जुना सर्व्हे क्र. २१३ व नवीन सर्व्हे क्र. ५३ च्या भूखंडधारकांचे भूखंड गुंठेवारीत नियमाकुल करणे, गजानन नगरी अंतर्गत प्लॉट घेतलेल्या शहरी व ग्रामीण भागातील भूखंड धारकांना नियमाकुल करून सातबारा पुर्नरूज्जीवित करून देणे, सावंगी मेघे येथील सर्व्हे क्र. मधील ०.४० हेक्टर आर गुंठेवारी प्रकरण तसेच अन्य प्रलंबित प्रश्नांवर बैठकीत चर्चा होणार असून यावर तोडगा करण्यासंदर्भात विवार विनिमय करण्यात येणार आहे.

## अवैधरित्या रेतीची वाहतूक

**▢ कोसुर्ला परिसरात कारवाई ▢४० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त**



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि.११ जून**

अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक करण्याचे सत्र सुरुच आहे. अशातच अल्लीपूर जवळील कोसुर्ला परिसरातुन रेतीची चोरटी वाहतुक करताना दोन ट्रक जप्त करण्यात आले. ही कारवाई अल्लीपूर पोलिसांनी करीत ४० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

पो.स्टे. अल्लीपुर हद्दीतुन होत असलेल्या अवैद्यरित्या विना पास परवाना रेती ची चोरटी वाहतुकीवर आळा घालण्याच्या हेतूने पोलिस पथक गस्तीवर असताना कोसुर्ला गावाजवळ एम.एच. ३६ एफ ८७९९ व एम.एच. २७ एक्स ३८९६ क्रमांकाचे टिप्पर कात्री फाट्याकडून रेती घेऊन येताना दिसले, दोन्ही ट्रक थांबवून वाहतुकीचा परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे कुठलाही परवाना दिसुन आला नाही. परिणामी पोलिसांनी दोन्ही वाहने जप्त केली. तसेच चालक गणेश आत्राम, वय (४७)रा. देवळी गुरूदेव मोतीराम देशमुख, वय (४८) वर्षे, रा. देवळी यांना ताब्यात घेतले.ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक विजयकुमार घुले, अजय रिठे, निखिल वासेकर, विठ्ठल केंद्रे आदींनी केली.

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी नियोजन करा

**▢राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीचा आढावा**

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ११ जून**

आगामी काळात होणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगर पालिकांच्या निवडणूका पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी व मतदारांना मतदान केंद्रावर उत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी चांगले नियोजन करा, अशा सूचना राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर पालिका निवडणूक तयारीच्या आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ३१६ ग्रामपंचायती तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद व ६ नगर परिषदेच्या निवडणूका घेण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने आढावा घेण्यात आला. बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी., ग्राम पंचायत निवडणूक प्राधिकारी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीपती मोरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अनील गावीत, वर्धाचे उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, आर्वीचे विश्वास शिरसाट, हिंगणघाटचे आकाश अवतारे, नगर पालिका प्रशासन अधिकारी सौरभ कावळे, परिविक्षाधिन उपजिल्हाधिकारी विनायक पाटील, वर्धेचे मुख्याधिकारी विजय देशमुख तसेच सर्व तालुक्याचे तहसिलदार उपस्थित होते. ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रातील प्रभाग रचना २०११ च्या जनगणनेच्या आधारावर होणे आवश्यक असून निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ईव्हीएम मशीनची उपलब्धता करुन ठेवावी. आवश्यकता पडल्यास निवडणूक आयोगाकडून किंवा इतर राज्यातून उपलब्ध करुन घ्याव्यात. निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार एक किंवा दोन टप्प्यात निवडणूक कार्यक्रम घेण्यात येईल, असेही यावेळी दिनेश वाघमारे यांनी सांगितले.

महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती औद्योगिक नगरी अधिनियमांतर्गत नगर परिषद व नगर पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी २०११ च्या जनगणनेनुसार सदस्य संख्या व प्रभाग रचना करावी, अशाही सूचना यावेळी दिनेश वाघमारे यांनी केल्यात.

**बुलडाणा अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या. बुलडाणा (मल्टीस्टेट)र. नं. २६७, शाखा -आर्वी, वेअर हाउस**

**जाहीर लिलाव**

बुलडाणा अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या. बुलडाणा (मल्टीस्टेट)र. नं. २६७ शाखा- आर्वी, येथील कर्जदार-श्री. सुरेंद्र रमेशप्रसाद उपाध्याय यांना वारंवार सुचना / नोटीस देण्यात येऊन सुद्धा कर्जाचा भरणा न केल्याने त्यांनी तारण दिलेल्या मालाचा लिलाव करण्यात येत आहे.

सदर मालाचा लिलाव, आहे त्या स्थितीत करायचा आहे, माल घेणा-या इच्छुकांनी बुलडाणा अर्बन वेअर हाऊस तळेगाव रोड, आर्वी, येथे दि. १४/०६/२०२५ दुपारी ११.०० वाजेपर्यंत उपस्थित राहावे.

| मालाचा प्रकार | मालाची प्रत | पोती कट्टे संख्या |
|---|---|---|
| सोयाबीन | मध्यम | १२१२ |

दि. १२/०६/ २०२५
स्थळ : बुलडाणा अर्बन वेअर हाऊस तळेगाव रोड, आर्वी,

विभागीय व्यवस्थापक
बुलढाणा अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या.
बुलडाणा (मल्टीस्टेट)र. नं. २६७,बुलडाणा

टीप :- सदर मालाला लिलावामध्ये योग्य भाव न आल्यास संस्था परस्पर मालाची विक्री करून आलेली रक्कम कर्जात जमा करण्यात येईल, याची थकबाकीदाराने नोंद घ्यावी.

**मध्य रेल्वे**

**ई-निविदा सूचना**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील खालील कामांच्या अंमलबजावणीसाठी, सीनियर डीईई/टीआरडी/नागपूर यांनी स्थापित कंत्राटदारांकडून डिजिटल स्वाक्षरी केलेले ऑनलाइन खुले ई-निविदा मागवल्या आहेत. ई-निविदा सूचना क्रमांक: NGP-ELECT-TRD-2025-26-07R दिनांक ०९.०६.२०२५. कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात एडीईई/टीआरडी/वरोरा यांच्या अधिकारक्षेत्रात चांदीच्या ब्रेझ्ड जॉइंट असलेल्या मेसर्स निक्को मेक कॉन्टॅक्ट वायरची जागा. कामाची अंदाजे किंमत: १,८१,१०,०९०.७५ रुपये (एक कोटी, एक्याऐंशी लाख दहा हजार, नव्वद रुपये आणि पंच्याहत्तर पैसे फक्त). बयाणा रक्कम: रु. २,४०,६००/- (फक्त दोन लाख, चाळीस हजार सहाशे रुपये). निविदा सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: ०३.०७.२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता. वेबसाइट पत्ता: या ई-निविदेबद्दल आणि ई-निविदेत ऑनलाइन सहभागासाठी संबंधित तपशील रेल्वे वेबसाइट www.ircps.gov.in वर उपलब्ध आहेत.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, नागपूर

AK/05/81

रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**

**ई-निविदा सूचना**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील खालील कामांच्या अंमलबजावणीसाठी, सीनियर डीईई/टीआरडी/नागपूर यांनी स्थापित कंत्राटदारांकडून डिजिटल स्वाक्षरी केलेले ऑनलाइन खुले ई-निविदा मागवल्या आहेत. ई-निविदा सूचना क्रमांक: NGP-ELECT-TRD-2025-26-06R दिनांक ०९.०६.२०२५. कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात एडीईई/टीआरडी/वर्धा यांच्या अधिकारक्षेत्रात चांदीच्या ब्रेझ्ड जॉइंट असलेल्या मेसर्स निक्को मेक कॉन्टॅक्ट वायरची जागा. कामाची अंदाजे किंमत: १,८१,१०,०९०.७५ रुपये (एक कोटी, एक्याऐंशी लाख दहा हजार, नव्वद रुपये आणि पंच्याहत्तर पैसे फक्त). बयाणा रक्कम: रु. २,४०,६००/- (फक्त दोन लाख, चाळीस हजार सहाशे रुपये). निविदा सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: ०३.०७.२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता. वेबसाइट पत्ता: या ई-निविदेबद्दल आणि ई-निविदेत ऑनलाइन सहभागासाठी संबंधित तपशील रेल्वे वेबसाइट www.ircps.gov.in वर उपलब्ध आहेत.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, नागपूर

AK/03/79

रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

# राघवीचे आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत यश

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ११ जून**

आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत राघवी राऊरकर या चिमुकलीने प्रथम स्थान मिळविले, सानेवाडी येथील रहिवासी असलेली ५ वर्षीय राघवी दत्तात्रय राऊत हिने सब ज्युनिअर गटात प्रथम क्रमांक मिळविला, अखिल नटराजम आंतर सांस्कृतिक संघाच्या वतीने गोवा येथे आयोजित या स्पर्धेत सब ज्युनिअर गटातून सानेवाडी येथील नागरिक दत्तात्रय व वीण राऊरकर यांची मुलगी राघवी हिने नृत्याचे सादरीकरण केले, यात तिला प्रथम स्थान मिळाले, राघवीला शुभम बारोडे, वैभव घुगे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले, तिने यशाचे श्रेय सचिन डंभारे, प्राचार्य सुरेश लकडे शिक्षक व आई-वडिलांना दिले.

# वादळी वा-याने पवनार आश्रमातील पिंपळाचे झाड कोसळले

## ❒एक महिला जखमी , ❒अनेकांच्या घरावरील छप्परही उडाले

**महासागर प्रतिनिधी**
**पवनार, दि. ११ जून**



मंगळवारी सांयकाळी आलेल्या वादळी पावसामुळे आश्रम परिसरातील जुन पिंपळाचे झाड कोसळल्याने एक महिला जखमी झाली, नागरिकांनी तातडीने । जखमी महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल केले, सुदैवाने कोणीतीही जीवितहानी झाली नाही, मात्र, परिसरातील तंबू आणि अन्य साहित्याचे प्रचंड नुकसान झाले, वनिता प्रभाकर हजारे (वय ५०) रा.पवनार असे जखमी महिलेचे नाव आहे.

आश्रम परिसरातील पिंपळाचे मोठे झाड मुळासकट उन्मळून पडले. नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे, या वादळामुळे गावातील अनेक भागात झाडे उन्मळून पडले असून, अनेक घरावरील पत्रे उडाल्याने तारांबळ उडाली आहे, अर्धातास राहिलेल्या या वादळाने कहर केल्याने प्रचंड नुकसान झाले, अचानक उदभवलेल्या परिस्थितीला सामोरे जाताना नागरिकांची तारांबळ उडाली. विजेचा पुरवठाही काही वेळेसाठी खंडित झाला होता, नुकसान झालेल्यांना भरपाई मिळण्याची मागणी होत असून तलाठी संजय भोयर यांनी पंचनामा केला आहे.

## अपघतात जखमी दोघांचा झाला

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ११ जून**

रस्ते अपघातात जखमी झालेल्या दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला, अक्षय गंगाधर उरकुडे (२६, रा. राळेगाव), दीपक महादेव पळसकर (५५, रा. तळेगाव) अशी मृतांची नावे आहेत,

तळेगावकडून आर्वीकडे जात असताना समोरुन भरधाव येणाया दीपक पळसकर यांच्या दुचाकीची धडक दिली, यात दीपक व अक्षय या दोघांचा मृत्यू झाला. या प्रकरणी तळेगाव पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

# कृषी विभागातील कर्मचा-याच्या मागण्याच्या पुर्ततेसाठी प्रयत्न करणार पालकमंत्री डॉ. भोयर



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ११ जून**

वर्धा. महाराष्ट्र राज्य कृषि विभाग लिपीक संवर्गिय अधिकारी व कर्मचा-यांच्या न्याय मागण्यांच्या पुर्ततेसाठी शासन दरबारी प्रयत्न करणार, असे आश्वासन राज्याचे गृह ग्रामीण, शालेय शिक्षण, गृहनिर्माण, खनिकर्म, सहकार राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य कृषि विभाग लिपीक संवर्ग संघटनेच्यावतीने पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांना आपल्या मागण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले. संघटनेच्यावतीने अधिकारी व कर्मचारी यांच्या न्याय मागण्यांसाठी प्रदीर्घ काळापासून शासन दरबारी रेटा सुरू आहे. या मागण्यांमध्ये कृषि विभागातील सुधारीत आकृतीबंधामध्ये लिपीक संवर्गातील अधिकारी व लिपीकांची पदे कमी करण्यात येऊ नये, लिपीक संवर्गातील पदोन्नतीस्तर मधील सहायक अधीक्षक पद गट ब मध्ये समाविष्ट करण्यात यावे, अधिकारी व कर्मचारी यांचे पदनाम ब्रिटीश कालीन असल्याने यामध्ये सुधारणा करण्यात यावी, विभागातील वरिष्ठ लिपीकांची १०० टक्के पदे पदोन्नतीने भरण्यात यावी या मागण्यांचा समावेश आहे. संघटनेने शासनाला १५७०.१९ कोटी रूपयांच्या बचतीचा आकृतीबंध सादर केला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याची मागणी संघटनेने केली आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष रविसिंह ठाकूर, उपाध्यक्ष अविनाश भागवत, कोषाध्यक्ष अमोल पोले, सचिव अतुल शिंदे, मार्गदर्शक गजानन राठोड, वर्षा वरघट, हर्षदा बांबल, वैशाली मरसकोल्हे, हर्षल सडमाके, प्रवीण बोरकर, किर्ती राठोड, सुचिता सयाम, संजय मांडोकर, संतोष बावणकर, अमोल मुनेश्वर आदी उपस्थित होते.

## कर्जामुळे महिलेने केली आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा,, दि.११ जून**

समुद्रपूर तालुक्यातील मारडा शिवारात एका ४५ वर्षीय महिलेने कर्जामुळे आत्महत्या केली, तिने शेतीसाी बचत गटामार्फत कर्जाची उचल केली, महिलेने कर्ज शेतीसाी घेतले होते, मात्र, शेतीत सतत नापिकी होत असल्याने तिच्या कुटुंबाचा खर्च भागवणेही अवघड झाले, तसेच हे कर्ज तिला परतफेड न करता आल्याने कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत तिने आत्महत्या केली, या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद सिंदी (रे) पोलिसांनी केली आहे.

### पोहणा परिसरात विद्युत खांब कोसळले

**हिंगणघाट, :** तालुक्यातील पोहणा मंडळातील सस्ती, हडस्ती आणि धोची या गावामध्ये सोमवारी रात्रीच्या सुमारास जोरदार वादळामुळे परिसरातील ७० विद्युत खांब कोसळले, त्यामुळे भागातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता.

# अवैध दारूची वाहतूक करणा-यावर कारवाई

## सावंगी ( मेघे ) पोलिसांकडून कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ११ जून**

अवैधरित्या दारूची वाहतूक करणा-यावर सावंगी (मेघे) पोलिसांनी कारवाई केली, ही कारवाई ८ जून रोजी करण्यात आली,

पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरुन नाकाबंदी केली, पोलिसांनी नाकाबंदी केली पोलिसांनी नयन रामटेके (वय ३०) रा. पुलफैल ता. जि. वर्धा यांच्या ताब्यातील दुचाकी पायदानावर ठेवून असलेल्या खरडयाच्या दारुसाठा आढळून आला, पोलिसांनी वाहन, दारूसाठा असा ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, याप्रकरणी सावंगी पोलिसांनी मिळालेल्या गुन्हा दाखल केला, ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलिस अधीक्षक सागर कवडे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक संदिप कापडे, यांच्या निर्देशाप्रमाणे अमोल खाडे, सतिष दरवरे, संजय पंचभाई, अनिल वैद्य, निखिल फुटाणे, अमोल जाधव यांनी केला, अधिक तपास पोलीस करीत आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्वेक्षणाला १८ जूनपर्यत मुदतवाढ

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ११ जून**

प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्वेक्षणाला १८ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जे कुटुंब या सर्वेक्षणातून सुटले होते, त्यांच्या घराचे स्वप्न आता पूर्ण होणार आहे. योजनेच्या सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्याची मागणी सरपंच संघटनेने केली होतीा या संदर्भात आमदार कुणावार यांनी वरिष्ठांकडे मागणी धरुन लावली होती. मागणीला यश आले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्यातील प्रपत्र-ड सर्वेमध्ये तांत्रिकदृष्टाा अपात्र सर्वेक्षणातून सुटलेले नवीन लाभार्थ्यांचा समावेश करण्यासाठी १ते३१ मे पर्यंत टप्पा-२ चे सर्वेक्षण करण्यात आले. परंतु सर्वेक्षणाचा कालावधी व इतर तांत्रिक अडचणींमुळे अनेक लाभार्थी योजनेपासून वंचित झाले होते. त्या सर्व लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी आमदार कुणावार व सरंपच संघटन्ने सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. याबाबत संबंधितांनी दखल घेत आता १८ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे सर्वेक्षणापासुन वंचित लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

## घरातून मोबाईलसह दागिने पळविले

**वर्धा, :** बंद घरात प्रवेश करुन चोरटयाने मोबाईलसह सोन्याचे दागिने चोरून नेले, ही घटना हिंगणघाटसह येथील तुकडोजी वॉर्ड परिसरात घडली, याप्रकरणी जयंत शरद अटेल यांनी हिंगणघाट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, चोरटयांनी अटेल यांच्या घरातून मोबाईल, चांदीची चाळ, सोन्याचे मणी व सोन्याचे डोरले, ब्रेसलेट असा २२ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला.

# नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी ठाणेदार जोशी यांचा अनोखा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**आष्टी (श), दि. ११ जून**



पोलीस स्टेशन आष्टी अंतर्गत वाहतुकीच्या रस्त्यावर नेहमीची वर्दळ तसेच वन्य प्राण्यांचा वावर यामुळे संभाव्य अपघाताचा धोका लक्षात घेता रात्रीला वाहतुकीकरिता सुलभ अशा चिन्हांची तसेच माहितीचे रेडियम बोर्ड ठिकठिकाणी लावून होणाऱ्या अपघाताला टाळण्यासाठी तसेच प्रतिबंध होण्यासाठी ठाणेदार आष्टी यांनी अनोखा उपक्रम सुरू केलेला आहे. ठाणेदार नागरिकांच्या सुरक्षांकरिता किती बाध्य आहेत हे या उपक्रमातून दिसून येते.

# तीन कुलूपबंद घरातून १ लाख ८ हजारांच्या मुद्देमालाची चोरी

## भाईपुर पुर्नवसन येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**आर्वी,दि११ जून**



अज्ञात चोरटयांनी कुलूपबंद असलेल्या तीन घराला निशाना करुन १ लाख ८ हजाराच्या मुददेमालाची चोरी केली, ही घटना आर्वी पोलिस ठाण्याच्या भाईपुर पुर्नवसन केशवनगर येथून उघड झाली, या प्रकरणी अज्ञात चोरटयाविरुद्ध आर्वी पो. स्टे. ला गुन्हा दाखल करण्यात आला.

सविस्तर वृत्त असे की, पराग रमेश चोरे (वय ३८) हे सावंगी रुग्णालयात खासगी नोकरी करीत असल्याने बालाजीनगर सावंगी येथे राहत होता,

७ जून रोजी सकाळी घरी चोरी झाल्याचे दिनेश सातपुते यांनी माहिती दिल्याने तो भाईपुर पुर्नवसन, आर्वी येथे गेला, त्यांनी घराची पाहणी केली असता घराचे दार त्यांना उघडे दिसले, त्यांनी आत जावून पाहिले असता कानातील चांदीची वाटी व चांदीचा चम्मच किंमत २० हजार रुपये, चांदीचे ६ सिक्के, किंमत ३ हजार रुपये, नगदी ५ हजार रुपये, असा एकुण २५ हजारांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेला, या प्रकरणी पराग चोरे यांनी तक्रार दाखल केली, तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दुस-या घटनेत निंबोली (शेंडे) येथे शुभम प्रकाश चतुर यांचे घरी चोरी झाली, अज्ञात चोरटयांनी कपाटामधील नगदी १ हजार रुपये चोरून नेले, याप्रकरणी तक्रारीवरुन आर्वी पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुद्ध गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

### चोरटयांचा बंदोबस्त करावा

गेल्याक ही दिवसात शहरात चोरीच्या घटना सतत घडत आहे, शहरातील कुलूपबंद असलेल्या घराला टार्गेट करुन रात्री दरम्यान, चोरी दरम्यान, चोरी करतात, घरात असलेले सोन्याचे दागिने, नगदी, असा मुददेमाल चोरुन नेतात, भुरटया चोरटयांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### चोरटयांनी ८२ हजार केले लंपास

अंकुश रामाजी रेंडके वय ५१ रा. केशवनगर, आर्वी कामानिमित्त ७ जून रोजी अकोला येथून लग्न आटोपून केशवनगर येथे घरी आले, घरी आले असता त्यांना कुलूप तुटलेले दिसले, घरातील ड्रॉवरमध्ये ठेवून असलेले २८ हजार, असा एकुण ८२ हजार रुपयांचा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेला असल्याचे दिसले, घटनेची माहिती आणि पोलिसांनी देण्यात आली, पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुद्ध गुन्हा नोंदविला.

## निधन वार्ता

### जनाब शकील खान



**पुलगाव, :** भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश सचिव, जनाब शकील खान (६५)यांचे आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली नातवंडे असा आप्तपरिवार आहे.


# शेतातील तिळाचा ढीग पेटविला

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ११ जून**

शेतात कापणी करून लावून ठेवलेला तीळाचा ढीग अज्ञात व्यक्तीने पेटविला, घटनेमुळे शेतकयांचे मोठे नुकसान आर्थिक नुकसान झाले, ही घटना सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गणेशपूर शेत शिवारात ५ जून रोजी भर दुपारी उघडकीस आली, या प्रकरणी ७ जून रोजी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली, उद्धव चंपतराव कोल्हा (६५) रा. क्षीरसमुद्रपूर यांच्या तक्रारीवरुन अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला, शेतक-याला नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



## आजचा वाढदिवस
### दै. महासागर
### परिवारातर्फे शुभेच्छा



हंसिका निठाने



स्नेहल रामटेके



महेंद्र रामटेके



राहुल पंदिलवार



राहुल जामुनकर



श्याम साटोने




विजय कल्याणी



प्रितम गावंडे



# शहरातील सारंगगारमध्ये प्राण पक्ष्यांचा अधिवास





**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणघाट, दि. ११ जून**

**घरटी गणनेची नोंद :** गाय बगळा -८१०, छोटा बगळा - २७, छोटा पानकावळा - ०९, भारतीय पानकावळा - ११, रात ढोकरी --५८

येथील तहसील कार्यालय, पंचायत समिती, जि. प. उप-अभियंता कार्यालय परिसरात असलेल्या ३६ झाडांवर पान पक्षांची मिश्र विणवसाहत आहे. पाणपक्ष्यांच्या या विणवसाहतीला मराठीत सारंगगार तर इंग्रजीमध्ये हेरॉनरी म्हणतात. दरवर्षी मे महिन्याचा पहिल्या आठवड्याला पाणपक्षी या परिसरामध्ये घरटी बांधायला सुरुवात करतात. जून महिन्यात या घरट्यांची गणना करुन पक्षिमित्र संघटना त्याचे संरक्षण करीत आहे. पक्ष्यांच्या घरट्यांमध्ये मोठी वाढ झाली असुन ३६ झाडांवर ९१५ घरट्यांची नोंद घेण्यात आली.

रविवारी या सारंगगारातील घरट्यांची गणना करण्यात आली घरट्यांची गणना करून याचे संरक्षण करणे. त्याबद्दल माहिती गोळा करणे या हेतूने आयोजित या प्रजातीनिहाय घरटी गणनेच्या कार्यक्रमात निसर्गसाथी फाउंडेशन, नगरपरिषद हिंगणघाट तसेच महाराष्ट्र पक्षिमित्र वर्धा जिल्हा शाखा सहभागी झाले होते. याप्रमाणे पाच प्रजातींच्या पान पक्षांची घरटी या वसाहतीमध्ये आढळून आली असून गायबगळा प्रजातीचे सर्वाधिक ८१० घरटी आढळून आली आहे. जून महिन्यात या घरट्यांची गणना करुन पक्षिमित्र संघटना त्याचे संरक्षण करीत आहे. पक्ष्यांच्या घरट्यांमध्ये मोठी वाढ झाली असुन ३६ झाडांवर ९१५ घरट्यांची नोंद घेण्यात आली.

निसर्गसाथीचे अध्यक्ष प्रवीण कडू, महाराष्ट्र पक्षीमित्राचे राहुल वकारे, वन विभागाचे माजी वनपाल अशोक भानसे, डॉ. संदीप मुडे, पंचशील थुल, प्रशांत भोयर, यशवंत शिवणकर, अंजोर कडू यांनी घरटी गणनेच्या कार्यात सहभाग नोंदविला. या सारंगगाराचे संवर्धन व संरक्षण करणे गरजेचे आहे व ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे आवाहन करण्यात आले.

### सारंगगारचा इतिहास

हिंगणघाट शहरातील ही सारंगगार पन्नास वर्षे जुनी आहे. प्रथम ती पंचायत समितीच्या प्रांगणात असलेल्या कवट वृक्षावर मर्यादित होती. प्रजननातून होणारे पिल्लं मोठे झाले की परत प्रजानासाठी या ठिकाणावर येत असे. नैसर्गिकरीत्या ही जागा त्यांना प्रजननाची आहे. असे नैसर्गिक संकेत या पक्षांना मिळत असते. या संकेताप्रमाणे ते प्रजननासाठी इथे दरवर्षी येऊन घरटी करत असतात. एकट्या कवट वृक्षावर जास्त घरटी करता येत नाही म्हणून त्यांनी इतर झाडावर घरटी करायला सुरुवात केली. आज ते कवट वृक्ष पडल्यानंतर या परिसरातील ३६ झाडांवर पक्षांची घरटी होत आहे. यामध्ये आंबा, खोटा अशोक, शीशम, करंजी, वड, पिंपळ, केशिया सेमिया, सप्तपर्णी, गुलमोहर, देशी बाबूळ या झाडांवर ही घरटी आहे.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
६६०३२/१९९७
महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपुरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९१२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.

